## निवडक

### बोरी येथे अहिल्यादेवी होळकर यांची जयंतीनिमित्त कार्यक्रम उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**बोरी, दि. १४ :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी म्हणजे कठोर पण जनता भिमुख प्रशासक कसा असावा याचं मूर्तीमंत उदाहरण होय, असे उद्‌गार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक नीलेशजी गद्रे यांनी बोरी येथे प्रतिभा फ्रेंडस सर्कल आयोजित अहिल्यादेवी होळकरांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात काढले. प्रमुख वक्ते म्हणून व्यासपीठावरून उपस्थित जनसमुदायाला प्रबोधन करताना ते पुढे म्हणाले अहिल्यादेवींचे जीवन म्हणजे प्रजाहितदक्ष, कर्तव्यदक्ष ,न्यायप्रिय प्रशासकाचा चालता बोलता इतिहास आहे. एका छोट्याशा गावात धनगर पाटील कुटुंबात जन्म घेतलेल्या या मुलीने अगदी आपल्या सातव्या आठव्या वर्षी आपलं धाडस, स्वाभिमान, कर्तव्यदक्षता, हुशारी, चलाखी, याची प्रचिती, बाजीराव पेशवे आणि मल्हारराव होळकर सारख्या मातब्बर सेनापतींना दिली ती घटना खरोखरच अचंबित करणारी आहे, हे ही त्यांनी सोदाहरण पटवून दिले. त्यांच्या राजकीय व प्रशासकीय जीवनावर पुढे प्रकाश टाकताना ते म्हणाले, अहिल्याबाई या मालवा सारख्या लहान राज्याच्या प्रमुख होत्या. मल्हारराव होळकरांच्या आग्रहास्तव त्यांनी सतीजाण्याचे टाळले व राजगादी सांभाळली. त्यासाठी लागणारे पूर्ण शिक्षण लहानपणीच मल्हारवानी त्यांना दिले होते, ते किती सार्थ होते. याचीही प्रचिती त्यांच्या प्रशासकीय निर्णयातून दिसून येते. संपूर्ण भारतातील सर्व ज्योतिर्लिंगांचा जिर्णोद्धार त्यांनी केला. गंगेचे पाणी सर्व ज्योतिर्लिंगामध्ये पोहोचवण्यासाठी कावड यात्रा सुरू करून एका परीने सगळा देश एकसंघ कसा राहील याचाही विचार त्यांनी केला. थोडक्यात लहानशा राज्याच्या प्रमुख पदी असून सुद्धा संपूर्ण देशाचा विचार करणाऱ्या त्या महान राजकर्त्या होत्या, असे गौरवोद्‌गार त्यांनी काढले. या त्यांच्या जयंतीनिमित्ताने प्रत्येक भारतीयाने त्यांच्या चरित्राचा अभ्यास करावा, असे आवाहन आहे, त्यांनी उपस्थितना केले. यावेळी व्यासपीठावर बोरी जिल्हा पंचायतीचे सदस्य दीपक बोरकर, तसेच प्रतिभा फ्रेंडस सर्कलचे अध्यक्ष जयंत मिरींगकर हे उपस्थित होते. दीपा मिरींगकर यांनी सूत्रसंचालन, मनोज आमशेकर यांनी प्रास्ताविक तर मीननाथ उपाध्ये यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. श्रीकृष्ण वेरेकर यांनी सामूहिक गीत प्रस्तुत केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. सदर कार्यक्रम बोरी देऊळवाडा येथील श्री राघवेंद्र स्वामी सभागृहात झाला.

### सेंत्रो एदुकादोर संस्थेचा १०० टक्के निकाल

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. १४ :** प्रियोळ येथील सेंत्रो एदुकादोर संस्थेच्या शिक्षा सदन शाळेचा दहावीचा निकाल शंभर टक्के लागला. यावर्षी दहावीचे एकूण २४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी पाच विद्यार्थी विशेष श्रेणीत, नऊ प्रथम श्रेणीत तर दहा विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. रक्षा गावडे हिने ८७.३३ टक्के गुण मिळवून शाळेत पहिली येण्याचा मान पटकावला, तर यशिता नाईक हिने ८२.३३ टक्के गुण मिळवून शाळेत द्वितीय क्रमांक पटकावला व भार्गव गावडे शाळेत तिसरा आला. सेंट्रो एदुकादूर संस्थेचे अध्यक्ष संजय प्रियोळकर, शाळेचे व्यवस्थापक सतीश कारेकर व इतर पदाधिकारी तसेच पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष आत्माराम नाईक व इतर सदस्यांनी विद्यार्थ्यांसह शाळेच्या मुख्याध्यापिका थलिमा हळर्णकर, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे अभिनंदन केले.

### कासारपाल येथील शासकीय विद्यालयाचा ९६.३० टक्के निकाल

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. १४ :** डिचोली तालुक्यातील लाटंबार्से पंचायत क्षेत्रातील हुतात्मा बाबुली नारायण गावस स्मृती शासकीय माध्यमिक विद्यालय – कासारपालचा २०२४ – २५ सालचा शालान्त परीक्षेतील दहावीचा निकाल ९६.३० टक्के लागला आहे. यात मनोज कुडचिरकर यांने ८१.५० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम आला.

साक्षी कासारपालकर हिने ७८.६७ टक्के गुण मिळवून द्वितीय, तर रुद्र कवळेकर याने ७५.८३ गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला. या विद्यालयातून शालान्त परीक्षेला एकूण २७ विद्यार्थी बसले होते, त्यातील २६ विद्यार्थी उत्तीर्ण झालेत. त्यात तीन विद्यार्थी विशेष श्रेणीत, पाच विद्यार्थी प्रथम श्रेणीत, बारा विद्यार्थी द्वितीय श्रेणीत, सहा विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झाले तर एका विद्यार्थ्याला एटीकेटी प्राप्त झाली. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सिद्धी खानोळकर व शिक्षक वर्ग तसेच पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष गुरुदास गाड्डी व इतर सदस्य यांनी उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### आरसीबीच्या कर्णधाराला १२ लाखांचा दंड

**मुंबई, दि. १४ :** सोमवारी रात्री मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर झालेल्या मुंबई इंडियन्स (एमआय) विरुद्धच्या सामन्यात स्लो ओव्हर रेटसाठी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघाचा कर्णधार रजत पाटीदारला १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. आयपीएलने जारी केलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा या हंगामातील पहिला सर्वात कमी षटकांचा वेग आहे. त्यामुळे नियमांच्या कलम २.२ अंतर्गत कर्णधार रजत पाटीदार यांना १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. रजत हा चौथा कर्णधार आहे ज्याला स्लो ओव्हर्ससाठी दंड ठोठावण्यात आला

# मुंबईला इंडियन्सचा थरारक विजय

## दिल्लीचा १२ धावांनी पराभव : रियान रिकल्टनची महत्त्वपूर्ण खेळी

**दिल्ली, दि. १४ :**



मुंबई इंडियन्स संघाने दिल्ली कॅपिटल्सचा त्यांच्या घरच्या मैदानावर पराभव करत थारारक विजय मिळवला. इंडियन प्रीमियर लीग २०२५च्या २९व्या सामन्यात अखेर मुंबईला विजयी सूर गवसला आहे. सलग ४ सामन्यांत पराभव स्वीकारल्यानंतर दिल्लीविरुद्ध दिल्लीच्याच मैदानात विजय मिळवण्यास मुंबईला यश मिळाले आहे. मुंबईने दिल्लीसमोर विजयासाठी २०६ धावांचे आव्हान ठेवले होते. मात्र मुंबईने दिल्लीला १२ धावांनी हरवत आपल्या पराभवाची मालिका खंडित केली आहे.

तिलक वर्माच्या धावांच्या खेळीच्या जोरावर मुंबई इंडियन्सने पहिल्यांदा फलंदाजी करताना २० षटकांत २०५ धावा केल्या होत्या. तिलक वर्माने जबरदस्त खेळ करताना ३३ बॉलमध्ये ५९ धावा ठोकल्या. या दरम्यान त्याने ६ चौकार आणि ३ षटकार ठोकले.

त्याआधी सलामीसाठी आलेला रोहित शर्मा पुन्हा अयशस्वी ठरला. त्याने १८ धावा केल्या. रियान रिकल्टनने २५ बॉलमध्ये ४१ धावांची खेळी केली. तर सूर्यकुमारने यादवने फटकेबाजी करताना २८ बॉलमध्ये ४० धावा तडकावल्या. नमन धीरने नाबाद ३८ धावा केल्या. शेवटच्या बॉलवर विल जॅक्स आणि नमन धीर यांनी धावून ४ धावा काढल्या. दिल्लीकडून विप्रज निगम आणि कुलदीप यादवने २ धावा ठोकल्या.

मुंबईने दिलेले हे आव्हान खरंतर दिल्लीसाठी मोठे नव्हते. दिल्लीच्या करूण नायरने ४० बॉलमध्ये ८९ धावांची दमदार खेळी केली. मात्र ही खेळी संघाला विजय मिळवून देऊ शकली. शेवटच्या षटकांमध्ये दिल्लीचे विकेट पटापट गेले आणि दिल्लीचा पराभव झाला. शेवटच्या षटकांमध्ये दिल्लीचे ३ विकेट झटपट पडले.

# अक्षरला १२ लाख रुपयांचा दंड

**दिल्ली, दि. १४ :**



दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार अक्षर पटेलला स्लो ओव्हर रेटसाठी १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. रविवारी दिल्लीतील अरुण जेटली क्रिकेट स्टेडियमवर दिल्ली कॅपिटल्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात खेळल्या गेलेल्या सामन्यात स्लो ओव्हर रेटसाठी त्याला हा दंड ठोठावण्यात आला आहे.

बीसीसीआयने आपल्या निवेदनात लिहिले आहे की, आयपीएल आचारसंहितेच्या कलम २.२२ अंतर्गत या हंगामात त्याच्या (पटेलच्या) संघाचा हा पहिलाच गुन्हा होता. त्यामुळे पटेल यांना १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सला पराभवाचा सामना करावा लागला. दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सने २० षटकांत २०५ धावा केल्या. ज्यामध्ये रोहितने १८, रिकेल्टनने ४१, सूर्यकुमार यादवने ४०, तिलक वर्मा यांनी ५९ आणि नमन धीरने नाबाद ३८ धावा केल्या. दिल्लीकडून विप्रज निगमने २ आणि कुलदीपने २ विकेट घेतल्या.

प्रत्युत्तरादाखल, या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्ली एकेकाळी विजयी स्थितीत होती पण मुंबईच्या गोलंदाजांनी सामना त्यांच्या बाजूने वळवला आणि १२ धावांनी विजय मिळवला. दिल्लीकडून करुण नायरने ८९, अभिषेक पोरेलने ३३, केएल राहुलने १५, आशुतोष शर्माने १७ आणि विप्राजने १४ धावा केल्या. मुंबईकडून कर्ण शर्माने ३ आणि सँटनरने २ विकेट घेतल्या.

आयपीएल २०२५ च्या हंगामात स्लो ओव्हर्ससाठी वेगवेगळ्या कर्णधारांना दंड ठोठावण्याची ही सहावी वेळ आहे. राजस्थान रॉयल्सना दोनदा, मुंबई इंडियन्स, लखनौ सुपर जायंट्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि दिल्ली कॅपिटल्सना प्रत्येकी एकदा दंड ठोठावण्यात आला आहे.

# मोहन बागान विरुद्ध पंजाब मुलांच्या अंतिम फेरीत

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १४ :** ड्रीम स्पोर्ट्स चॅम्पियनशिप फुटबॉल २०२५ राष्ट्रीय अंतिम फेरीत मोहन बागान आणि विद्यमान विजेते पंजाब यांच्यात अंडर–१७ मुलांच्या गटात सामना होणार आहे, तर अंडर–१७ मुलींच्या गटात झारखंडचा सामना ओडिशाशी होणार आहे. हे दोन्ही सामने मंगळवारी, १५ एप्रिल रोजी राया पंचायत क्रीडांगणावर खेळवले जातील. मुलींचा अंतिम सामना संध्याकाळी ५.३० वाजता आणि मुलांचा सामना रात्री ७.३० वाजता होणार आहे. भारतीय फुटबॉलचे दिग्गज भैचुंग भूटिया आणि सुब्रत पॉल हे भव्य अंतिम सामन्याचे विशेष पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. मुलांच्या गटात, मोहन बागानने रिलायन्स फाउंडेशन यंग चॅम्प्स, चेन्नई यिन एफसी आणि धेंपो एससी यांच्यावर निर्णायक विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला. तर विद्यमान विजेते पंजाब एफसीनेही नॉर्विच सिटी एफसी, सेसा एफए आणि फुटबॉल ४ चेंज यांच्यावर विजय मिळवत अंतिम फेरी गाठली. मुलींच्या गटात, झारखंडने गोवा, कर्नाटक आणि आसाम यांच्यावर सलग तीन विजय मिळवत अंतिम फेरीत स्थान मिळवले,

# ओडिशा विरुद्ध झारखंड मुलींचा आज अंतिम सामना

**गोवा मुलींची स्पर्धेतील पहिली विजय**

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १४ :** ड्रीम स्पोर्ट्स चॅम्पियनशिप फुटबॉल २०२५ राष्ट्रीय अंतिम फेरीतील मुलींच्या अंतिम सामन्यात ओडिशाचा सामना झारखंडशी मंगळवार दि. १५ रोजी होणार आहे.

रविवारी संध्याकाळच्या सामन्यात ओडिशाने दिल्लीविरुद्ध २–२ अशी बरोबरी साधली, पण आधीच्या विजयांमुळे त्यांनी अंतिम फेरीत स्थान मिळवलं. ओडिशासाठी कर्णधार इप्शिता राऊत (१६वा मिनिट) आणि किरण दीप (५६वा मिनिट) यांनी गोल केले, तर दिल्लीसाठी तन्या सिंग (५२वा मिनिट) आणि दीवा (९४वा मिनिट) यांनी गोल केले.

संध्याकाळच्या दुसऱ्या सामन्यात केरळने राजस्थानचा ६–० असा धुव्वा उडवला. केरळसाठी एस. सोना (३२वा व ६६वा मिनिट), आयशा मिरहाना (४७वा व ८१वा मिनिट) आणि कर्णधार भाग्य विनोद (५७वा व ७६वा मिनिट) यांनी प्रत्येकी दोन गोल केले.

रविवारी सकाळी झारखंडने असमचा १–० असा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. ड्रऋउतरडा मैदानावर झालेल्या या सामन्यात शौलिना डँग हिचा १९व्या मिनिटातील शानदार गोल निर्णायक ठरला. झारखंडच्या भक्कम बचावफळीने संपूर्ण सामना सांभाळला. या गटातील दोन्ही संघांनी पहिल्या दोन सामने जिंकले होते, त्यामुळे हा सामना अर्ध–अंतिमसारखा झाला, आणि झारखंडने अंतिम फेरीत मजल मारली.

सकाळच्या दुसऱ्या सामन्यात, ड्रऋ बेनौली मैदानावर, गोवाने कर्नाटकाशीचा सामना ३–० ने जिंकून स्पर्धेतील आपला पहिला विजय नोंदवला. पहिल्या सत्रात कोणताही गोल झाला नव्हता, मात्र दुसऱ्या सत्रात गोवाने वर्चस्व गाजवले. प्रिसी परेरा हिने सलग दोन गोल (५२वा आणि ५६वा मिनिट) केले, त्यानंतर पर्ल फर्नांडिसने ८९व्या मिनिटाला तिसरा गोल करत विजयावर शिक्कामोर्तब केले. मंगळवार, १५ एप्रिलसाठी अंतिम सामन्यांचे वेळापत्रक, स्थळ – राय पंचायत क्रीडांगण मुलींचा अंतिम सामना – झारखंड विरुद्ध ओडिशा – संध्याकाळी ५.३० वाजता मुलांचा अंतिम सामना, पंजाब विरुद्ध मोहन बागान – संध्याकाळी ७.३० वाजता होईल.

# भूमिका नर्सिंग कॉलेजमध्ये आरोग्य दिन उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड



**पर्ये सत्तरी : जागतिक आरोग्य दिन कार्यक्रमात सहभागी कॉलेजच्या प्राचार्य डॉ. एस. वसंताकुमारी, प्राध्यापक व इतर.**

**साखळी, दि. १४ :** पर्ये–सत्तरी येथील श्री भूमिका नर्सिंग कॉलेजतर्फे कॉलेजच्या सभागृहात जागतिक आरोग्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

हायब्रीड मोडमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'निरोगी सुरुवात, आशादायक भविष्य' या थीमखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात होते. या कार्यक्रमात तिरुवन्नमलाई, तामिळनाडू येथील गांधीमठी कॉलेज ऑफ नर्सिंगच्या प्राचार्य नर्सिंगतज्ज्ञ डॉ. आर. जयलक्ष्मी यांनी झूम पद्धतीने मार्गदर्शन केले. प्राचार्य, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी व विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

प्राचार्य डॉ. एस. वसंताकुमारी यांनी डॉ. आर. जयलक्ष्मी यांची ओळख करून दिली. तसेच त्यांनी माता आणि नवजात शिशूचे आरोग्य आणि कल्याण तसेच बाळंतपणादरम्यान आणि नंतर नर्सिंग व्यावसायिकांच्या भूमिकेवर मार्गदर्शन केले. निरोगी मुलेच उद्याचा सशक्त समाज घडवू शकतात असे सांगून जन्मापासून मुलाची काळजी घेण्याची गरज व्यक्त केली. माता आणि नवजात मृत्यू रोखण्यासाठी कृती तीव्र करण्याची हीच महत्त्वाची वेळ आहे, असे ही त्या म्हणाल्या.

'निरोगी सुरुवात आशादायक भविष्य' या विषयावर डॉ. आर. जयलक्ष्मी यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी बाळाच्या जन्मानंतर काळजी घेण्यावर मार्गदर्शन केले. तसेच आई आणि बाळाची काळजी घेणेही महत्त्वाचे असल्याचे सांगितले. त्यानंतर सभागृहात ऑफलाईन पद्धतीने कार्यक्रम घेण्यात आला. विद्यार्थी प्रतिनिधी सिया तारी यांनी आभार मानले.

# पुढील साठ वर्षासाठी वीजपुरवठा नियमित

## वीज मंत्री सुदिन ढवळीकर : डिचोलीत ३३केव्ही थिवी डिचोली भुयारी वीजवाहिनी कामाचा प्रारंभ

■ टीम दैनिक हेराल्ड



**डिचोली : थिवी ते डिचोली भुयारी वीज वाहिनी घालण्याच्या कामाचा प्रारंभ करताना मंत्री सुदिन ढवळीकर. बाजूला आमदर डॉ. चंद्रकांत शेट्ये, आमदार प्रेमेंद्र शेट, विजय नाटेकर, शैलेश बुर्ये, वल्लभ सामंत वल्लभ साळकर व इतर.**

**डिचोली, दि. १४ :** पुढील साठ वर्षासाठी वीज पुरवठा नियमित व व्यवस्थित ठेवण्यासाठी आम्ही अमूलाग्र बदल घडवत आहोत. सुमारे पाच हजार कोटी खर्चून कामे सुरु आहेत.अनेक तांत्रिक बदल घडवत वीज क्षेत्रात मोठे परिवर्तन करण्याची योजना पंतप्रधान मोदी, मुख्यमंत्री डॉ प्रमोद सावंत, केंद्रीय वीज मंत्री याचे योगदान लाभत आहे.

गोव्यात १९६५ ते ७५ नंतर आता सर्व ठिकाणी नवेट्रान्सफॉर्मर वीज केंद्रे सुविधा बहाल करण्यात येत असून संपूर्ण गोव्याचा वीज क्षेत्रात कायापालाट केला जात असल्याचे वीज मंत्री सुदिन ढवळी कर यांनी सांगितले.

जनतेची सेवा करताना प्रामाणिक असणे गरजेचे असून आम्ही गेले साठ वर्षे जुनी उपकरणे बदलून आधुनिक सुविधा बहाल केल्या आहेत. राज्यात आठशे मेगावेट वीज होते काही प्रमाणात वीज बिल मध्ये वाढवणे गरजेचे आहे. पाच पैसे वाढलेकी विरोधक गोंधळ घालतात. आम्ही प्रत्येक मतदारसंघात साठ कोटी खर्च करीत आहोत, त्यामुळे काही प्रमाणात वीज वाढ अपेक्षित आहे.

वीज निर्मिती करताना ७२ टक्के कोळसा पासून तयार होते उर्वरित २८ टक्के ग्रीन एनर्जी हाय ड्रॉ सॉलर व इतर माध्यमातून होत असते. पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी २०३०पर्यन्त ५०० मेगा वेट वीज भारत निर्माण करणार असून त्यातून कोळसाचे होणारे प्रदूषण दूर करणारअसल्याचे निश्चित केले आहे, असे ढवळीकर म्हणाले.

राज्यात वीज निर्मिती अल्प दरात मिळते. आमचा दर पाच रुपये असून इतर राज्याच्य तुलनेत गोवा वीज क्षेत्रात सर्वात आदर्श आहे, असे ढवळीकर म्हणाले. चांगल्या गोष्टी करताना लोकांना चांगलीवीज घरोघरी मिळावि हा आमचा उद्देश आहे. डिचोली तालुक्यात सुमारे २००कोटींची कामे मंजूर झाली आहेत, असे ते म्हणाले.

३३केव्ही थिवी ते डिचोली भुयारी वीज वाहिनी मूळे अनेक सुधारणा होणार असून डिचोली, मये, थिवी मतदारसंघात लाभ होणार आहे. डिचोली येथे आयोजित ३३केवी थिवी ते डिचोली भुयारी वीज वाहिनि पाया भरणी सोहळा आयोजित केला होतात्या वेळी मंत्री सुदिन ढवळीकर बोलत होते. यावेळी डॉ चंद्रकांत शेट्ये, आमदार प्रेमेंद्र शेट, नगराध्यक्ष विजय नाटेकर, दीपा पळ शैलेश बुर्ये, वल्लभं सामंत, वल्लभ साळकर आदी उपस्थित होते. शैलेश बुर्ये यांनी स्वागत केले. ३३केव्ही चीं वीज वाहिनी

२८कोटी रुपये खर्चून सुमारे वीस किलोमीटरची भुयारी वीज वाहिनी घातल्यानंतर विशेष करून पावसात वीज पुरवठा सुरळीत होण्यास मदत होणार आहे.११केव्ही वीज वाहिन्या डिचोली भागात काम पूर्ण होत आहेत.

विजयकुमार नाटेकर यांनी डिचोलीत वीज व्यवस्था व इतर विकासात मोठे योगदान मंत्री व आमदार योगदान देत असल्याचे सांगितले. मान्यवरांच्या हस्ते कामाचा प्रारंभ करण्यात आला. सूत्र संचालन विश्वास चोडणकर यांनी तर वल्लभ सामंत यांनी आभार मानले.



**पर्वरी : स्वातंत्र्य सैनिका कालिंदी शेणवी जुवारकर यांचा सत्कार करताना उत्पल परींकर प अमिता सलत्री, समवेत प्रीती शेट्ये, स्मिता कारेकर आणि इतर.**

# महिला परिषदेतर्फे खास कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १४ :** अखिल भारतीय महिला परिषदेच्या गोवा विभागातर्फे अलिकडेच महिलांसाठी एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या विभागाच्या पर्वरी येथे असलेल्या महिला वसतिगृहाच्या सभागृहात साजरा झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून समाज कार्यकर्ते उत्पल पर्रीकर उपस्थित होते. तर सन्माननीय पाहुण्या म्हणून अभिनेत्री, लेखिका अमिता नायक सलत्री उपस्थित होत्या.

आजच्या महिलांनी सर्वच क्षेत्रात प्रवेश केला आहे. राजकारणांतही मोठ्या संख्येने महिला कार्यशील होत आहेत. दिल्लीमध्ये आज मुख्यमंत्री म्हणून श्रीमती रेखा गुप्ता यांची निवड झाली आहे, ही एक भूषणास्पदच गोष्ट आहे, असे प्रतिपादन उत्पल पर्रीकर यांनी केले. 'महिला सशक्तीकरण' या विषयावर अमिता नायक सलत्री यांनी उपयुक्त, असे मार्गदर्शन केले.

प्रारंभी स्मिता कारेकर, सरस्वती शिरोडकर, सुरेखा भोसले यांनी स्वागतपर गीता सादर केले. यावेळी ९२ वर्षांच्या स्वातंत्र्यसैनिक कालिंदी शेणवी जुवारकर यांचा दोन्ही मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन खास असा सत्कार करण्यात आला.

तसेच काही कर्तृत्वान महिलांनाही यावेळी दोन्ही मान्यवरांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले. यामध्ये लता सरदेसाई, लोचन बांदोडकर, विकिता नायक, रंजित शेट्टी, संजना गावडे, मनिषा खांडेपारकर, देवता सावंत, नूतन सावंत, समीक्षा वेसणेकर आणि विधी दंड यांचा समावेश होता. यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाही सादर करण्यात आले. पणजी भगिनी मंडळाच्या सदस्य राधा वाद्य, शीतल गायतोंडे, विंदा सरदेसाई, रती नायक, रश्मी नायक व रक्मा रामाणी यांनी संगीत शारदा नाटकाचा एक अंक सादर केला. गीता कामत यांनी शास्त्री नृत्य सादर केले. प्रारंभी महिला परिषदेच्या अध्यक्षा प्रीती शेट्ये यांनी स्वागतर भाषण केले. दीपा खेर यांनी आणि प्रदर्शन केले. पूजा केंकरे यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २२२ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 222 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .